CMYK

**प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल : राज्यपाल जिष्णु देव वर्मा** >> पान 2

**अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील दोन महिलांचा मृत्यू** >> पान 3

**खामगाव एमआयडीसीत एलपीजी गॅस गळतीचे 'महा-मॉकड्रिल' यशस्वी** >> पान 4

### सुविचार


चुका आणि अपयश हा प्रगतीचाच भाग असतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com    मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 241 ■ शुक्रवार, दि. 10 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सलमान खान स्टारर 'मातृभूमी' हा एक सामान्य वॉरवर आधारित चित्रपट नसेल**

आतील पान

# इस्त्रायलचे लेबनॉनवर हल्ले; ३०३ ठार, १,१५० जायबंदी

## युद्धविराम शर्तींचा भंग; अमेरिका-इराण तणाव कायम : होर्मुझ खुली करण्यावरून संभ्रम

**वॉशिंग्टन डी.सी./ तेहरान :** इस्त्रायली सैन्याने बुधवारी आणि गुरुवारी लेबनॉनमध्ये शेकडो क्षेपणास्त्रांनी भीषण हल्ले केले. यामध्ये ३०३ लोकांचा मृत्यू झाला. या हवाई हल्ल्यात किमान १,१५० लोक जायबंदी झाले. या हल्ल्यात लेबनॉनमधील बंडखोर गट हिजबुल्लाचा प्रमुख नईम कासिम याचा पुतण्या आणि वैयक्तिक सल्लागार अली युसूफ हर्शी याला ठार केल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. यामध्ये हिजबुल्लाच्या १०० हून अधिक कमांड सेंटर्स आणि लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आले. लेबनॉनमधील लिटानी नदीच्या उत्तर ते दक्षिण भागात प्रवासासाठी वापरल्या जाणार्या दोन महत्त्वाच्या क्रॉसिंगवरही हल्ले केले आहेत. या मार्गांचा वापर हजारो शस्त्रे, रॉकेटस् आणि लाँचर्स यांच्या वाहतुकीसाठी केला जात होता.



अमेरिका आणि इराण यांच्यात बुधवारी युद्धविराम झाल्यानंतर संपूर्ण जगाने सुटकेचा निःश्र्वास सोडला होता; परंतु हा आनंद आता अल्पजीवी ठरण्याची शक्यता आहे. इराणने अमेरिकेवर युद्धबंदीच्या तीन प्रमुख अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, इराणसोबत झालेला करार पूर्णपणे अंमलात येईपर्यंत अमेरिकन सैन्य इराणच्या आसपासच्या परिसरात तैनात राहील, अशी घोषणा केल्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव अद्याप कायम असल्याचे चित्र आहे.

### या तीन प्रमुख अटींचे उल्लंघन...

- युद्धविरामानंतरही लेबनॉनमध्ये हल्ले सुरूच
- इराणच्या हवाई हद्दीचे उल्लंघन होत आहे
- इराणच्या अणुकार्यक्रमाला अमेरिकेचा विरोध

अमेरिका आणि इराण यांच्यातील शस्त्रसंधीनंतरही मध्य पूर्वेतील परिस्थिती अद्याप पूर्णपणे स्थिर झालेली नाही. या प्रदेशात तणाव कायम आहे. इराणचे नेते मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी म्हटले आहे की, अमेरिकेने १० कलमी प्रस्तावातील मूलभूत अटींचा भंग केला आहे.

**होर्मुझ सामुद्रधुनी अद्याप खुली नाही**

अबू धाबीच्या अडनॉक या सरकारी तेल कंपनीचे प्रमुख सुलतान अल जाबेर यांनी, होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्याचा जहाजांचा मार्ग अजूनही इराणकडून मर्यादित, अटींवर आधारित आणि नियंत्रित ठेवण्यात आला आहे.

अमेरिका : जर या कराराचे पालन केले गेले नाही, तर पुन्हा एकदा संघर्ष भडकेल आणि तो पूर्वीपेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिशाली आणि अधिक विनाशकारी असेल.

इराण : ज्या पायावर वाटाघाटी केल्या जाणार होत्या, तो पायाच ढासळला आहे. त्यामुळे या टप्प्यावर पुढील वाटाघाटी करणे किंवा युद्धबंदी कायम राखणे, तार्किकदृष्ट्या योग्य ठरत नाही.

### शिवछत्रपतींची महती सांगणाऱ्या दिल्लीतील संग्रहालयाचं लोकार्पण

नवी दिल्ली : रयतेचे स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची महती सांगणाऱ्या आधुनिक संग्रहालयाचं (छत्रपती शिवाजी महाराज इमर्सिव्ह मल्टी-डायमेंशनल म्युझियम) गुरुवारी (९ एप्रिल) लोकार्पण करण्यात आलं. दिल्लीतील कुतुब इन्स्टिट्यूशनल एरियामधील या संग्रहालयाचं उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी दक्षिण दिल्लीचे खासदार रामवीर बिधुरी हेही उपस्थित होते.

### क्रॉस-बॉर्डर रोबोटिक शस्त्रक्रिया

मुंबई : मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयाने जागतिक आरोग्य दिन २०२६ रोजी एक मोठे यश संपादन केले आहे. रुग्णालयाचे डॉक्टर टी. बी. युवराजा यांनी मुंबईत बसून ओमानमधील मस्कत येथील मेडिकल सिटी रुग्णालयात ५५ वर्षीय महिलेचे रोबोटिक किडनी ऑपरेशन केले. ही सीमापार रिमोट रोबोटिक शस्त्रक्रिया भारतातून पहिल्यांदाच करण्यात आल्याचे मानले जात आहे. ही शस्त्रक्रिया प्रगत 'मेडबॉट ट्युमाई' रोबोटिक प्रणाली आणि रिअल-टाइम कनेक्टिव्हिटीद्वारे करण्यात आली. डॉक्टरांनी दूर बसून संपूर्ण ऑपरेशन नियंत्रित केले आणि यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पूर्ण केली.

### महिला प्रवाशांना दिलासा

**मुंबई :** लोकलमधून प्रवास करणाऱ्या महिलांना आता घाबरण्याची गरज नाही कारण चर्चगेट ते डहाणू दरम्यान लोकलनं प्रवास करणाऱ्या लाखो महिला प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने (ठझऋ) महिलांच्या सुरक्षेसाठी 'सखी' हा विशेष व्हॉट्सअ‍ॅप उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून महिला प्रवासी थेट आरपीएफच्या महिला अधिकाऱ्यांशी जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत त्यांना आता अवघ्या काही मिनिटांत मदत मिळणार आहे.

### आठवलेंकडून राज्यपालांची भेट

**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम जिष्णू देव वर्मा यांची रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली.बुद्धमूर्ती आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट देऊन राज्यपालांचा शाल पुष्पगुच्छ देऊन रामदास आठवले यांनी सत्कार केला. महाराष्ट्रातील धर्मांतरित बौद्धांची जनगणनेत अनुसूचित जातीत नोंद करण्यात यावी.राज्यात ज्यांनी अनुसूचित जातीतून बौद्ध धम्मात धर्मांतर केले आहे अशा नवबौद्ध समाजाची नोंद जनगणनेत अनुसूचित जातीत व्हावी या मागणीच्या अनुषंगाने ही भेट होती.

# पार्थ पवारांनी घेतली खासदारकीची शपथ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड आज देशाच्या राजधानीत पाहायला मिळाली. दिवंगत अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी आज राज्यसभेच्या खासदारकीची अधिकृत शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यावेळी पार्थ पवार यांच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, ज्याची चर्चा आता संपूर्ण महाराष्ट्रभर रंगली आहे. पार्थ पवार यांनी संसदेत प्रवेश करताना परिधान केलेले कपडे हे त्यांचे वडील अजित पवार यांची आठवण करून देणारे होते. अजित पवार ज्याप्रमाणे अनेकदा गुलाबी जॅकेट आणि डोळ्यावर चष्मा अशा विशिष्ट शैलीत दिसतात, तसाच हुबेहूब लूक पार्थ पवार यांनी केला होता. त्यांच्या या 'दादा स्टाईल' लूकमुळे सोशल मीडियावर पार्थच्या रूपाने संसदेत दुसरे दादा आलेत, अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.



पार्थ पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीची शपथ इंग्रजी भाषेत घेतली. शपथ घेतानाचा त्यांचा आत्मविश्वास आणि संयमित देहबोली लक्षवेधी ठरली.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पार्थ पवारांच्या आई आणि खासदार सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे दिल्लीत उपस्थित होते. आपल्या मुलाला खासदार म्हणून पाहताना सुनेत्रा पवार यांच्या चेहऱ्यावर अभिमान स्पष्ट दिसत होता.

पार्थ पवार यांच्या या शपथविधीमुळे पवार कुटुंबाचा भारतीय संसदेतील दबदबा अधिकच वाढला आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्यानंतर आता पार्थ पवार यांच्या रूपाने कुटुंबातील तिसरी पिढी संसदेत सक्रिय झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा क्षण मानला जात असून, दिल्लीतील पक्षाचे प्रतिनिधित्व आता अधिक प्रबळ होणार आहे.

### प्रयागराज हादरलं!

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आज म्हणजेच गुरुवार ९ एप्रिल रोजी अतीक अहमदचा ड्रायव्हर मोहम्मद इरफान, याची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना प्रयागराज मधील केली येथील बिस्मिल्लाह चौकाजवळ घडली. या घटनेने प्रयागराज हादरलं आहे. बिस्मिल्लाह चौकाजवळ इरफान चहा पित असताना हा हल्ला झाला. चेहऱ्यावर रुमाल बांधलेले चार हल्लेखोर दोन मोटरसायकलवरून आले होते. त्यापैकी एकजण खाली उतरला आणि थेट इरफानच्या छातीत गोळी झाडली. गोळीबार होताच परिसरात घबराट पसरली आणि आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

### कारलाच बनवले घर

**अहमदाबाद :** सध्या देशभरात कार मॉडिफिकेशनचं वारं वाहत असलं तरी गुजरातच्या एका पठ्ठ्याने मात्र कल्पकतेच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. कारला केवळ अलॉय व्हील्स किंवा एलईडी लाईट्स न लावता, त्याने थेट कारची 'चालती-फिरती बेडरुम' तयार केली आहे. या अनोख्या '१इक्ध' कारचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून नेटकरी हे पाहून थक्क झाले आहेत.

# तरुणांसाठी मंत्रालयात कामाचा थाट

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील कल्पक आणि उत्साही तरुणांसाठी प्रशासकीय सेवेचा अनुभव घेण्याची सुवर्णसंधी पुन्हा एकदा उपलब्ध झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मुख्यमंत्री फेलोशिप प्रोग्राम' यावर्षीही सुरू ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे प्रशासनात काम करण्याची इच्छा असलेल्या तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. केवळ रोजगार उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मर्यादित हेतू नसून, तरुणांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा उपयोग सरकारी योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी करणे हा मुख्य उद्देश आहे. निवड झालेल्या फेलोना थेट मंत्रालयात काम करण्याची आणि राज्याच्या धोरण-निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याची संधी मिळणार आहे.

यावर्षी एकूण ६० जागांसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे. या प्रक्रियेत सामाजिक समावेशकता जपण्यासाठी ३३ टक्के जागा, म्हणजेच एकूण २० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय कामात महिलांचा सहभाग वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या फेलोशिपसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांची वयोमर्यादा २१ ते २६ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. शैक्षणिक पात्रतेचा विचार करता, उमेदवाराने कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ६० टक्के गुणांसह पदवी संपादन केलेली असावी. विशेषतः अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबतच किमान एक वर्षाचा कामाचा अनुभव असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निकषांची पूर्तता करणाऱ्या तरुणांनाच राज्याच्या धोरण-निर्मिती प्रक्रियेत थेट सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

या फेलोशिपसाठी निवडल्या जाणाऱ्या उमेदवारांना दरमहा ६१,५०० रुपये मानधन दिले जाणार असून, त्यांना शासकीय सेवेतील 'गट-अ' दर्जाच्या अधिकाऱ्याप्रमाणे समकक्ष मान दिला जाणार आहे.ही नियुक्ती १२ महिन्यांच्या कंत्राटी स्वरूपाची असली तरी, थेट मंत्रालय आणि मुख्यमंत्र्यांच्या चमूसोबत काम करण्याची संधी या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरत आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली काम केल्यामुळे मिळणारा अनुभव भविष्यात स्पर्धा परीक्षा किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातील मोठ्या पदांसाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

# नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणाची शक्ती -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** सर्व जगामध्ये नवकार महामंत्राचा आजच्या पवित्र दिवशी सामूहिक जप होत आहे. आपली संस्कृती ही विश्वबंधुत्वाची आणि शांती प्रस्थापित करणारी आहे. आपल्या संस्कृतीला नवकार महामंत्र निश्चितच सर्वव्यापी करतो. नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणची शक्ती असून विश्वशांतीसाठी या महामंत्राच्या जपाचा निश्चितच सकारात्मक परिणाम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्यावतीने विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन वरळी येथील एनएससीआय डोम मध्ये करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर आचार्य परम सागर महाराज, निरंजन सागर महाराज, सौम्य सागर महाराज, मानव कोठारी, भगवत कोठारी,आशिष शहा आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या जगामध्ये सर्व सजीव प्राणी ही सृष्टीचे मुले आहेत. सर्वांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. 'जिओ और जीने दो' हे आपले तत्व जैन विचारांमधून प्रतिपादित होते. विश्व कल्याणसाठी यापेक्षा दुसरा विचार असूच शकत नाही. नवकार मंत्र हा अशा विचारांना पुढे नेण्यास मदत करतो. नवकार मंत्राच्या जपातून पाप शुद्धी होऊन सकारात्मक कार्य करण्याची ऊर्जा मिळते. या महामंत्राच्या सामूहिक जपाने संपूर्ण विश्वाच्या शांतीसाठी एक महायज्ञ सुरू आहे. या मंत्रामुळे नवजीवन आपल्याला प्राप्त होते.

नवकार मंत्राच्या माध्यमातून पाच तत्वांना आपण नमस्कार करतो. सर्व जगाला यातून आपण नमस्कार करीत असतो. मंत्राच्या जपाने अरिहंत परिस्थिती निर्माण होते. तीर्थंकरांची अवस्था ही अरिहंताची आहे. या मंत्राच्या जपाने जगामध्ये असलेल्या सर्व सकारात्मक शक्ती आपल्याशी जोडल्या जातात. हा मंत्र केवळ व्यक्तीच्या विचारांनाच शांती देत नाही, तर 'इनर सेल्फ' लासुद्धा शांती देतो. विश्वशांतीचा विचार देणाऱ्या, आनंद देणारा , सकारात्मक शक्तींना जोडणाऱ्या या मंत्राचा जप विश्व कल्याणासाठी फलदायी आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले.

जैन समाज प्रत्येक जीव, जंतू, प्राणी यांचा विचार करणारा असून भूतदया आणि प्राणी सेवा ही समजात केली जाते. प्राणीसेवेचा विचार केवळ शब्दांमध्ये न ठेवता प्रत्यक्ष वास्तविकतेत जैन समाजामध्ये आणला जातो, असे गौरवोद्गार ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. कार्यक्रमाला जैन समाजातील आचार्य, मुनी, उपाध्यय, साध्वी व जैन समाज बांधव उपस्थित होते.

# भोंदू खरातविरोधात तक्रारींचा महापूर

## लैंगिक शोषणाचे आणखी ११ आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** वासनांध अशोक खरात प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून, तक्रारींची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. आधीच लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांमध्ये अटकेत असलेल्या खरातविरोधात आता आणखी ११ महिलांनी पुढे येत तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा व्याप आणि गंभीरता अधिकच वाढली आहे.

अशोक खरातविरोधात आधीच अनेक गुन्हे दाखल असताना, नव्या ११ महिलांच्या तक्रारींमुळे एकूण तक्रारींचा आकडा २२ वर पोहोचला आहे. यापैकी बहुसंख्य तक्रारी लैंगिक शोषणाशी संबंधित असल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे तपास यंत्रणांसमोर आव्हान अधिक वाढले आहे. तक्रारदार महिलांच्या म्हणण्यानुसार, खरात हा 'ऊर्जादान' आणि 'शरीरशांती'च्या नावाखाली महिलांशी संपर्क साधत असे. विश्वास संपादन केल्यानंतर त्यांना जाळ्यात ओढून त्यांचे शोषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



काही महिलांनी विरोध करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना धमक्या दिल्याचाही दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने महिलांना पुढे येण्यासाठी हेल्पलाईन सुरू केली होती. त्यानंतर तक्रारींचा ओघ वाढला असून, अनेक पीडित महिला पुढे येऊन आपली बाजू मांडत आहेत. यामुळे प्रकरणातील अनेक पैलू उघड होत आहेत. आतापर्यंत दाखल १२ गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे लैंगिक शोषणाशी संबंधित असून, ४ प्रकरणे आर्थिक फसवणुकीची आहेत. या सर्व प्रकरणांचा तपास डखढ कडून सुरू आहे. तसेच आर्थिक व्यवहारांच्या अनुषंगाने अंमलबजावणी संचालनालय देखील तपास करत आहे.

समता पतसंस्थेशी संबंधित व्यवहारांची स्वतंत्र चौकशीही सुरू आहे.

अशोक खरातची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले. एका प्रकरणात त्याला न्यायालयीन कोठडी मिळाली असून, इतर प्रकरणांमध्ये पुढील चौकशीसाठी पुन्हा पोलीस कोठडीची मागणी केली जाण्याची शक्यता आहे.

या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांनी तपासाच्या गती आणि पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष तपास व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या घटनेमुळे अंधश्रद्धा आणि महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. समाजात अशा प्रकारच्या भोंदूगिरीमुळे होणाऱ्या शोषणाविरोधात अधिक जागरूकता आणि कठोर कारवाईची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. तक्रारींचा वाढता आकडा आणि समोर येणारे आरोप पाहता अशोक खरात प्रकरण आणखी गंभीर वळण घेण्याची शक्यता आहे. येत्या काळात तपासातून आणखी महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




CMYK

## शस्त्रसंधीचे उल्लंघन...

अमेरिका आणि इराण यांनी ३९ दिवस चाललेल्या युद्धानंतर शस्त्रसंधीची घोषणा केली आहे. यामुळे जगाने सुटकेचा निःश्वास टाकला. आता ही शस्त्रसंधी स्थायी राहील, हे पाहण्याचे उत्तरदायित्व सर्व संबंधित देशांचेच आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात ३९ दिवस चाललेले युद्ध अखेर ४० व्या दिवशी १४ दिवसांची शस्त्रसंधी घोषित करण्यात आली आहे. त्यामुळे जगाने सुटकेचा निःश्वास टाकला. या युद्धामुळे अनेक देशांच्या इंधन पुरवठ्यात खंड पडला. अर्थव्यवस्थेची हानी झाली. शस्त्रसंधीमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा इंधन पुरवठा सुरळीत होण्याची शक्यता आहे. या शस्त्रसंधीचा परिणाम त्वरित जगाच्या शेअरबाजारांवर दिसून आला. भारतातही मुंबई शेअरबाजाराचा निर्देशांक २,९०० ने वधारला. हे युद्ध थांबण्याची जग किती आतुरतेने प्रतीक्षा करीत होते, हे यावरुन दिसून आले. कच्च्या इंधन तेलाच्या दरातही २० डॉलर्स प्रतिबॅरलने घट झाली. ही शस्त्रसंधी प्रदीर्घ काळ चालेल आणि ती युद्धबंदीत परिवर्तीत होईल, अशी जगाची अपेक्षा आहे. ती पूर्ण होईल की नाही, हे मात्र आत्ताच सांगता येणार नाही. कारण नव्या वृत्तानुसार, शस्त्रसंधी झाल्यानंतर काही तासांमध्येच इराणने पुन्हा कुवेत आणि संयुक्त अरब अमिरातीच्या तेलसाठ्यावर हल्ला केला आहे. या घटनेवरुन ही शस्त्रसंधी किती अनिश्चित आणि अस्थिर आहे, याचा प्रत्ययही त्वरीत आला. आता अमेरिका आणि इराण हे दोन्ही देश शस्त्रसंधी आपल्याच अटींवर कशी झाली आहे, हे ठसविण्याच्या मागे लागले आहेत. तसेच, ३९ दिवस चाललेल्या युद्धात कोणाचा विजय झाला, नैतिक विजय कोणाचा, कोणी प्रथम माघार घेतली आदी मुद्द्यांवर यापुढे काही दिवस जगात आणि विशेषतः भारतात आपापल्या राजकीय कलानुसार मतप्रदर्शन होईल. पण त्याला फारसा अर्थ असणार नाही. मुळात हे युद्ध, ते करणाऱ्यांनी प्रतिष्ठेचा विषय बनविले होते. त्यामुळे ते अपेक्षेपेक्षा अधिक काळ लांबले. तसेच, या युद्धात अमेरिका आणि इस्रायल यांच्या बाजूने किंवा इराणच्याही बाजूने कोणताही देश थेट उतरला नाही. अन्यथा, त्याला जागतिक युद्धाचे स्वरुप प्राप्त होऊन संपूर्ण जगाचीच घडी विस्कटली असती. तसे झाले नाही. कारण हे युद्ध करणाऱ्या देशांपेक्षा, इतर देशांनीच खूप समंजसपणा दाखविला. स्वतः कोणत्यातरी बाजूने या युद्धात पडून त्याची व्याप्ती वाढविली नाही. ही या युद्धाची खऱ्या अर्थाने सकारात्मक अशी फलनिष्पत्ती आहे. या युद्धात सर्वाधिक हानी इराणची झाल्याचे दिसून येते. सर्वाधिक नागरीक त्याच देशाचे मारले गेले. इराणने इस्रायल, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कुवेत, कतार आदी देशांवर अनेक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स डागली. तथापि, त्या देशांची प्रत्यक्ष हानी तुलनेने बरीच कमी झाल्याचेही आकडेवारीवरुन समजते. इराणने अणुबॉंब बनवू नये, म्हणून हे युद्ध करण्यात आल्याचे अमेरिकेचे आणि इस्रायलचे म्हणणे आहे. हे युद्ध करण्याची कारणेही प्रत्येकवेळी भिन्न भिन्न सांगण्यात आली. पण इराणची अणुबॉंब बनविण्याची शक्ती नाहीशी करणे, हे एकच कारण युद्धाला प्रारंभ झाल्यापासून शस्त्रसंधीपर्यंत समान राहिले. त्यामुळे तेच खरे असावे, असे मानण्यास जागा आहे. पण हा उद्देश पूर्ण झाला आहे काय आणि असेल तर किती प्रमाणात, हे समजण्यास सध्यातरी मार्ग नाही. या युद्धाचे भारतात राजकीय पडसाद कसे उमटले, यावर दृष्टीक्षेप टाकणे मनोरंजक ठरेल. अनेक विरोधी नेत्यांनी आणि विचारवंतांनी प्रतिक्रिया दिल्या. भारताने इराणची बाजू उघडपणे घेतली पाहिजे, असे काहींचे म्हणणे होते. भारत सरकार अमेरिका आणि इस्रायल यांचा निषेध का करत नाही, असा संतप्त प्रश्न काहींना पडला. भारताचे मौन त्याच्या दुर्बलतेचे लक्षण आहे, अशी टीका झाली. विश्वगुरु'' हे युद्ध थांबवत का नाहीत, अशी खोचक पृच्छाही झाली. परंतु, भारताने हे युद्ध थांबविण्यासाठी नेमके काय करावे, हे मात्र कोणीही स्पष्ट केले नाही. हे युद्ध भारताचे नाही. त्यामुळे कोणाचीही बाजू न घेण्याचे धोरण योग्यच आहे, असे दोन चार शहाणे सूर काही विरोधी नेत्यांकडून उमटले, ही बाब समाधानकारक मानली पाहिजे. हे युद्ध थांबविण्यासाठी पाकिस्तानने मध्यस्थी केली आणि पाकिस्तानातच पुढची चर्चा होणार आहे, असेही वृत्त प्रसिद्ध झाले आहे. पण या शस्त्रसंधीचा खरा सूत्रधार चीन आहे आणि पाकिस्तानचा उपयोग चीनच मध्यस्थ म्हणून करुन घेत आहे, अशीही चर्चा आहे. यावरुनही भारतात काही प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही नेत्यांच्या मते यामुळे पाकिस्तानची प्रतिष्ठा वाढणार आहे. त्यामुळे भारताची प्रतिष्ठा कमी होणार आहे आणि यासाठी विश्वगुरु पंतप्रधान नरेंद्र मोदी जबाबदार आहेत, असेही त्यांचे म्हणणे आहे. पण, हे युद्ध लवकर थांबवा. युद्धामुळे प्रश्न सुटणार नाही. चर्चेचा मार्गच योग्य आहे, हे भारत पहिल्या दिवसापासून सांगत होता. ३९ दिवस एकमेकांना ओरबाडल्यानंतर अखेर युद्धमान देशांना हे पटले. त्यांनी शस्त्रसंधी केली. याचा अर्थ, विश्वगुरु'' जे म्हणत होते तेच खरे ठरले. कोणताही गुरु (त्यात विश्वगुरुही आले) योग्य विचार व्यक्त करत असतो. तो मध्यस्थी करत नसतो. मध्यस्थी करणाऱ्याला प्रतिष्ठा मिळते असेही नाही. त्यामुळे या टीकेला फारसा अर्थ नाही. काहीही असले, तरी युद्ध थांबले हे चांगले झाले. आता ते पुन्हा होऊ नये, याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी, ही अपेक्षा आहे.

# प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** देशात दरवर्षी ३४ लाख टन प्लास्टिक कचरा तयार होत आहे. यापैकी ४० टक्के प्लास्टिक अंतिमतः नदी, नाले व भूगर्भात जात आहे. नद्या व समुद्रात प्लास्टिक गेल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. प्लास्टिक प्रदूषणामुळे मत्यव्यवसाय, पर्यटन व आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे प्लास्टिकला योग्य पर्याय शोधावा लागेल आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागातर्फे 'प्लास्टिक उत्पादने व प्लास्टिक पॅकेजिंग आवरणांचा पर्यावरणावरील दुष्परिणाम' या विषयावर आयोजित तज्ज्ञांच्या मुंबई येथे झालेल्या चर्चासत्राला राज्यपाल संबोधित करीत होते.

स्वच्छ पाणी व स्वच्छ पर्यावरणाशिवाय विकसित भारताचे लक्ष्य गाठता येणार नाही असे सांगून प्लास्टिक पासून पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन कॉर्पोरेट, उद्योग, नीती निर्माते या सर्वांना या कार्यात पुढाकार घ्यावा लागेल व त्यासाठी विद्यार्थी, युवक व समाजाच्या इतर सर्व घटकांमध्ये जागरुकता निर्माण करावी लागेल, असे राज्यपालांनी सांगितले.




शाश्वततेशिवाय झालेल्या विकासाला 'विकास' म्हणता येणार नाही असे सांगून राज्यपालांनी प्लास्टिक प्रदूषणाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी शासन, उद्योग जगत आणि नागरिकांना एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

तुम्ही वापरलेला पहिला टूथब्रश आजही भूगर्भात पडून आहे बाळकृष्ण पशुपती

ईश्वर सर्वव्यापी आहे, तसेच प्लास्टिकही आज सर्वव्यापी झाले असून हिमालयाच्या शिखरापासून समुद्राच्या सखोल भागापर्यंत प्लास्टिक पोहोचले आहे. तुम्ही वापरलेला पहिला टूथब्रश आज देखील जमिनीच्या पोटात कोठेतरी पडून आहे. त्यामुळे प्लास्टिक वस्तू व प्लास्टिक आवरणामुळे होणारे प्रदूषण कमी करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे भारतातील प्रमुख बाळकृष्ण पशुपती यांनी यावेळी केले.

रिझर्व्ह बँकेची शाश्वत वित्तपुरवठ्याची योजना असून त्यामाध्यमातून पर्यावरण रक्षणाच्या कार्याला वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून चालना दिली जात असल्याचे बँकेचे कार्यकारी अध्यक्ष आर. केशवन यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'वर्क इन प्रोग्रेस: रिड्युसिंग द प्लास्टिक फूटप्रिंट ऑफ प्रॉडक्ट्स अँड पॅकेजिंग' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

बैठकीला विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य शाश्वतता अधिकारी तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

# अनंत अंबानींच्या वाढदिवसानिमित्त 'गोसेवे'चा महासंकल्प!

## हनुमान मंदिरात १० कोटींचे दान; उभारली जाणार हायटेक गोशाळा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंबानी परिवाराने पुन्हा एकदा आपल्या दातृत्वाचा आणि सनातन धर्माप्रती असलेल्या निष्ठेचा परिचय दिला आहे. गुजरातच्या प्रसिद्ध साळंगपूर हनुमान मंदिरात भक्ती आणि सेवेचा अनोखा संगम पाहायला मिळणार असून, अंबानी परिवाराने येथील अत्याधुनिक गोशाळेसाठी तब्बल १० कोटी रुपयांचे भरघोस दान दिले आहे.

साळंगपूर मंदिर परिसरात २८ एकरच्या अवाढव्य जागेत ही गोशाळा उभारली जाणार आहे. विशेष म्हणजे, यासाठी स्वीडिश



कंपनी 'डेलावल' कडून तांत्रिक सहकार्य घेतले जात आहे. सुमारे १५ कोटी रुपयांच्या या प्रकल्पात ५०० गायींच्या निवासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध असतील. ही गोशाला केवळ आधुनिक नसेल, तर ती भारतातील आदर्श गोशाळांपैकी एक ठरेल. या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, अंबानी परिवार या संपूर्ण उपक्रमाचा मुख्य संरक्षक असेल.

अनंत अंबानी स्वत: या उपक्रमाचे नेतृत्व करत असून, त्यांनी या कार्यासाठी इतर कोणत्याही दात्याकडून मदत न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निस्वार्थ भावनेमुळे गोशाळेवर त्यांच्या परिवाराने सुचवलेले नाव कायमस्वरूपी कोरले जाणार आहे.

अनंत अंबानींच्या वाढदिवसानिमित्त साळंगपूर मंदिरात हनुमानजींच्या सन्निध्यात एक विशेष 'मारुती यज्ञ' देखील करण्यात आला. साळंगपूर मंदिराचे कोठारी स्वामी विवेकशंकर दासजी यांनी अंबानी परिवाराच्या या महान कार्याची प्रशंसा केली. ''अंबानी परिवाराची गोसेवेप्रती असलेली श्रद्धा आणि समर्पण वाखाणण्याजोगे आहे,'' अशा शब्दांत त्यांनी अनंत अंबानींना आशीर्वाद दिले.

अनंत अंबानी यांनी जामनगरमध्ये 'वंतारा' सारखे जगातील सर्वात मोठे प्राणी संवर्धन केंद्र उभारले आहे. आता साळंगपूरमधील ही अत्याधुनिक गोशाळा त्यांच्या प्राणीप्रेमाच्या प्रवासातील पुढचे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या उपक्रमामुळे भारतातील इतर देवस्थानांनाही आधुनिक गोशाळा उभारण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

### उद्योगपती अनंत अंबानींचा वाढदिवस; शिर्डी साईबाबा संस्थानला रिलायन्सकडून अन्नदानासाठी मोठी देणगी!

**शिर्डी । प्रतिनिधी :** उद्योगपती अंबानी कुटुंबीय शिर्डी साईबाबांचे भक्त असून साईबाबांच्या दर्शनासाठी अनेकवेळा येत असतात. तसंच वस्तू आणि रोख स्वरुपात साईबाबांच्या चरणी देणगी देत असतात. गुरुवारी रिलायन्स इंडस्ट्रीजचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त रिलायन्स इंडस्ट्रीजच्या वतीनं साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा प्रसादालयात अन्नदानासाठी देणगी दिली आहे. तसंच अंबानी कुटुंबीय नेहमी साईबाबांच्या चरणी निळ्या रंगाचं वस्त्र अर्पण करत असतात. गुरुवारीही अंबानी कुटुंबानं साईबाबांना निळ्या रंगाचं वस्त्र पाठवलं असून ते साईबाबांच्या माध्यान्ह आरतीवेळी अर्पण करण्यात आलं.

अन्नदान हेच श्रेष्ठ दान : रिलायन्स इंडस्ट्रीजच्या वतीनं शिर्डी साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा प्रसादालयात अन्नदानासाठी देणगी दिली आहे.

# नारी शक्ती वंदन : महाराष्ट्र अग्रेसर

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी, या एका कवितेच्या ओळी साऱ्यांनाच अवगत असल्या, तरी आपल्या देशात महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग हा तसा मर्यादितच राहिला आहे. केवळ साहित्य किंवा इतिहासातील चार- दोन दाखले देऊन हा विषय संपत होता. त्यामुळेच भारतात महिलांचे सशक्तीकरण हा केवळ चर्चेचा विषय होता. शहरी भागात शिक्षणाच्या सुविधांमुळे थोडी बरी स्थिती असली, तरी ग्रामीण भागात मात्र विदारक परिस्थिती होती. मात्र २०१४ नंतर देशात हे चित्र बदलायला सुरुवात झाली. देश सशक्त व्हायचा असेल, तर स्त्री सशक्त झाली पाहिजे हे स्वप्न पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सशक्तीकरणाला प्राधान्य दिले आणि त्यासाठी विविध योजना आणून त्याची अंमलबजावणीही सुरू केली. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या योजना राबवितानाच राज्याच्याही योजना सुरू करून महिला सक्षमीकरणाला बळ दिले. त्यामुळे पाळण्याची दोरी धरणारे हात आता देशाच्या अर्थकारणात आपले भरीव योगदान देऊ लागले आहेत.

महिला सशक्तीकरण म्हणजे नेमके काय, तर त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावे त्याचप्रमाणे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम होऊन समाजाच्या विकासात महिलांनी सक्रिय भूमिका बजावू शकणे. त्यासाठी महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे गरेजेचे असते. ग्रामीण भागातील महिला विविध अडचणींचा सामना सतत करीत असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेथील शिक्षणाचा अभाव. मुलगा आणि मुलींच्या शिक्षणाच्याबाबतीत पालकांकडूनच (जागृती नसल्याने) होणारा पक्षपात ही शैक्षणिक अभावाची कारणे. 'मुलीला शिकून काय करायचं आहे?' या मानसिकतेचसहच छोट्या- छोट्या गावांमध्ये नसलेली शैक्षणिक सुविधा हेही ग्रामीण मुली शिक्षणापासून दूर राहण्याचे महत्त्वाचे कारण होते. मुलींचे लवकर लग्न, आर्थिक अवलंबित्व, आरोग्य सुविधांची कमतरता, सामाजिक बंधने व परंपरा यांच्या दुष्टचक्रात ग्रामीण स्त्री अडकली होती. तिला त्यातून बाहेर काढणे गरजेचे होते. त्या पार्श्वभूमीवर महिला सशक्तीकरण अभियान अतिशय फायद्याचे ठरत आहे आणि त्याचे फार चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

महिला सशक्तीकरणामुळे मुलींच्या पारंपरिक शिक्षणाला प्रोत्साहनासहच त्यांना देण्यात येत असलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढू लागला आणि विविध ठिकाणी तिला रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. त्यामुळे हीच ग्रामीण स्त्री आता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ लागली आहे.

ग्रामीण भागात बहुतांश महिला शेतीशी जोडल्या गेल्या असतात. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय, हस्तकला, दुग्धव्यवसाय याद्वारे त्यांचे आर्थिक सक्षमीकरण वेगाने होऊ लागले. विविध गावांमध्ये स्थापन झालेल्या बचतगटांमुळे महिला एकत्र येऊन करीत असलेली वाटचाल क्रांती घडविणारी आहे. महिला सशक्तीकरणाच्या योजनेत छोट्या उद्योगांसाठी सरकारने त्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करून दिले आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांची समाजातील प्रतिष्ठा वाढते, याची प्रचीती आज ग्रामीण भागात विशेषत्वाने येत आहे.

ग्रामीण महिलांचे आरोग्य हाही तसा उपेक्षित विषय. त्यामुळे जगाचा उद्धार करण्याची क्षमता असलेली ग्रामीण स्त्री विविध आजारांचे ओझे घेऊनच जगत राहायची. आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून संसाराचा गाडा ओढणाऱ्या स्त्रीसाठी साध्या आरोग्य सुविधाही गावात नव्हत्या. त्यामुळे माता व बाल मृत्यूचे सर्वाधिक प्रमाण ग्रामीण भागातच पाहायला मिळत होते. राज्य शासनाने या महिलांसाठी पोषण आहार योजना आणलीच पण छोट्या- छोट्या गावांमध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देऊन कोवळी पानगळ थांबविली आहे. अलीकडेच अहेरी येथे खास महिलांसाठीच्या अत्याधुनिक रुग्णालयाचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. प्रकृती बिघडल्यावर मांत्रिकांकडे जाणाऱ्या या परिसरातील आदिवासी महिला आता या रुग्णालयाचा लाभ घेत आहेत. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील या महिला रुग्णालयामुळे परिसरातील महिलांची मोठी सोय झाली आहे.

महिलांमध्ये कायदेशीर व सामाजिक जागरुकता येण्यासाठी वारसा, संपत्ती, शिक्षण याबाबत महिलांचे हक्क काय आहेत, कौटुंबिक हिंसाचाराविरोधात ती कशी उभी राहू शकते, यावर महिला सशक्तीकरण अभियानाचा भर असल्याने ग्रामीण भागातील बदलत असलेली परिस्थिती या अभियानाचे यश अधोरेखित करणारी आहे.

बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला ई-हाट, उज्वला योजना या केंद्र सरकारच्या तसेच लाडकी बहीण या राज्यातील योजनेमुळेही महिला सशक्तीकरणाचा वेग वाढला हे नाकारता येत नाही. फक्त चूल आणि मूल सांभाळणारी ग्रामीण स्त्री आज पुरुषांच्या बरोबरीने राजकारणात येत आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत आहे. ग्रामपंचायत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेल्या आरक्षणाचा हा लाभ आहे.

महिला सशक्त झाली की फक्त तिचीच प्रगती होते असे नव्हे, तर एकूण कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते, मुलांच्या शिक्षणात वाढ होते आणि संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य व पोषण सुधारते. त्यामुळेच ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण हे केवळ महिलांसाठी नाही तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

महिला सशक्तीकरणाच्यादृष्टीने भारत सरकारने २०२३ मध्ये आणलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमामुळे राजकारणात ३३ टक्के आरक्षणाची तरतूद झाली आहे शिवाय लखपती दीदी सारख्या योजनेमुळे राष्ट्र निर्माण कार्यात त्यांचा सहभाग वाढला आहे.

सुरक्षा व स्वावलंबन

मिशन शक्ती अंतगर्त महिला व मुलींना त्यांचे कायदेशीर अधिकार, सुरक्षा, आरोग्य याविषयी जागरुक केले जात आहे.

आर्थिक सशक्तीकरण

केंद्र सरकारच्या लखपती दीदी योजना, महिला हाट, राज्य सरकारची लाडकी बहीण याद्वारे महिलांना स्वरोजगारासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यात येत आहे.

नारी शक्ती वंदन अधिनियम

या अधिनियमामुळे संसद तसेच राज्य विधानसभेत महिलांससाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याचा ऐतिहासिक कायदा नारी शक्ती वंदन अधिनियमामुळे अस्तित्वात आला आहे. २०२९ पासून देशात हा कायदा लागू होणार आहे.

आरोग्य

जन औषधी केंद्रामधून १ रुपयात सॅनिटरी पॅड उपलब्ध करणे तसेच नवजात बालिकांसाठी कन्या जन्मोत्सव आयोजित केला जात आहे, ही या सशक्तीकरण अभियानाचीच उपलब्धी म्हणावी लागेल. मुलींच्या उज्वल भवितव्यासाठी सुकन्या समृद्धी योजना, ग्रामीण महिलांच्या सहायतेसाठी महिला शक्ती केंद्र, स्वच्छ इंधनासाठी उज्वला योजना, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना नारी शक्ती पुकस्कार अशा छोट्या- छोट्या उपाययोजनांमुळे महिला सशक्तीकरणाने वेग घेतलेला दिसत आहे.

आपली संस्कृती मातृ शक्तीची पूजक आहे. विविध जोखडातून तिला मुक्त करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात तसेच राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी पावले उचलली, त्यामुळे महिलांना प्रगतीचा मार्ग गवसला आहे. विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा, एवढाच या अभियानाचा उद्देश नाही, तर आत्मनिर्भर भारताचे नेतृत्व महिला करू शकतील, यादृष्टीने या अभियानाद्वारे होणारी पायाभरणी अतिशय महत्त्वाची आहे. उद्याच्या समृद्ध आणि विकसित भारताचे स्वप्न महिला सशक्तीकरण योजनेत दडलेले आहे, एवढे नक्की.

०००

**अविनाश महालक्ष्मे**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी भरला उमेदवारी अर्ज



दैनिक आपला विदर्भ

**बीड । प्रतिनिधी :** बीडमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी अखेर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गावकऱ्यांच्या आग्रहामुळेच आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

अश्विनी देशमुख म्हणाल्या की, अण्णा जिवंत असताना त्यांनी गावासाठी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले आणि आता त्यांची अपूर्ण स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. गावकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच मी ही जबाबदारी स्वीकारली असून शेवटच्या क्षणापर्यंत गावाची सेवा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गावकऱ्यांच्या पाठिंब्यामुळेच आम्ही निवडणुकीत उतरलो असून ही आमची वैयक्तिक इच्छा नव्हती, असेही त्या म्हणाल्या आहेत..

### दुसऱ्या नवऱ्याकडून पत्नीचा पेट्रोल पंपावर गळा चिरून खून; एका तासात आरोपी ताब्यात



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगरमध्ये आज एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. करमाड परिसरातील पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या महिलेचा तिच्याच दुसऱ्या नवऱ्याने भर दिवसा गळा चिरून खून केला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

करमाड परिसरातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपावर ही घटना घडली. पूजा गवांडे असे मृत महिलेचे नाव आहे. ती पंपावर काम करत असताना सत्यम गवांडे याने धारदार चाकूने तिच्या गळ्यावर वार करत तिचा निर्घृण खून केला.माहितीनुसार, पूजाचे यापूर्वी एक लग्न झाले होते आणि तिला एक मुलगा व एक मुलगी आहे. पहिल्या पतीच्या निधनानंतर काही महिन्यांपूर्वी तिने सत्यम गवांडे याच्यासोबत आळंदी येथे विवाह केला होता.

मात्र, लग्नानंतर दोघेही एकत्र राहत नव्हते. सत्यम गवांडे याला दुसरे लग्न करायचे असल्याने तो पूजाकडे सोडचिठ्ठी देण्याचा तगादा लावत होता. मात्र, पूजाने यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद निर्माण झाला आणि त्यातूनच त्याने हा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच करमाड पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अवघ्या एका तासात आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

### पत्रकाराला धमकावल्याच्या प्रकरणात अशोक खरातवर वर्षभरानंतर गुन्हा दाखल; शिर्डी पोलीस भोंदूबाबाचा मागणार ताबा

शिर्डी (अहिल्यानगर) : श्रीरामपूर येथील एका माध्यमाचे पत्रकार दत्तात्रय खेमनर यांनी एक वर्षापूर्वी कॅप्टन अशोक खरातच्या भोंदूगिरीचे कारनामे पुढे आणणार असल्याची बातमी छापल्यानंतर त्यानं खेमनर यांना मानहानीची नोटीस पाठविली होती. त्यानंतर जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पत्रकार दत्तात्रय खेमनर यांनी आज श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्या तक्रारीनुसार वृत्तपत्रात महिलांचे लैंगिक शोषण आणि भोंदूगिरी संदर्भात बातमी प्रसिद्ध केली होती. ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली होती. त्यानंतर अशोक खरातनं खेमनर यांना तब्बल ५ कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवली होती. या नोटीसीनंतरही प्रकरण थांबले नाही. उलट धमक्यांचे प्रमाण वाढल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, मार्च ते एप्रिल २०२५ या कालावधीत अज्ञात व्यक्तींमार्फत वारंवार जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. तसेच फोनद्वारे प्रत्यक्ष भेटूनही धमकावण्यात आल्याचं नमूद करण्यात आलं आहे. या धमक्यांमुळे पत्रकार खेमनर यांनी त्यांनी पोलिसांकडे संरक्षणाची मागणीही केली. पोलिसांनी खेमनर यांना पोलीस संरक्षणही दिलं आहे.

## भाविकांच्या गाडीला उत्तर प्रदेशातील गाजीपुर नंदगज येथे अपघात

# अकोला, बुलढाणा जिल्हयातील दोन महिलांचा मृत्यू

- केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य आणि जिल्हा प्रशासनाशी साधला संपर्क
- जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे केले निर्देशीत तर दिल्लीहुन एक चमुही अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी रवाना

दैनिक आपला विदर्भ









**बुलढाणा। प्रतिनिधी :** काशि विश्वनाथ दर्शनासाठी नेपाळकडे जाणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रेकरुंच्या बसचा वाराणसी-गोरखपुर महामार्गावरील गाजीपुर जवळ अपघात होऊन या अपघातात दोन महिलांचा घटनास्थळीच मृत्यु झाला आहे. यातील एक महिला बुलढाणा जिल्हयातील तर दुसरी महिला अकोला जिल्हयातील रहिवाशी आहे. तर अपघातात ३८ भाविक जखमी झाले आहे. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले असुन अपघाताची माहिती मिळताच केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब९ कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधुन जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देशित केले.

जय श्रीराम टुर्स एँड ट्रॅव्हल्स कंपनीच्या वतीने आयोजीत देवदर्शन पर्यटन यात्रे निमीत्त महाराष्ट्रातील ३८ भाविक अयोध्या व इतर तिर्थक्षेत्र दर्शनाकरीता निघाले होते. आज ९ एप्रिल रोजी यात्रेकरु भाविकांची बस वाराणसी-गोरखपुर या महामार्गाने मार्गक्रम करत असतांनाच सकाळी ११.३० च्या सुमारास उत्तर प्रदेशातील गाजीपुर जवळील नंदगज येथे बसचा अपघात घडला. या अपघातामध्ये २ महिलांचा मृत्यू झाला. यामध्ये अकोला येथील ५० वर्षीय अन्नपुर्णाबाई तर बुलढाणा जिल्हयातील मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील सरस्वतीबाई पाखरे यांचा समावेश आहे. उर्वरीत ३५ यात्रेकरु या अपघातात जखमी झाले आहेत. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले आहे. यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. तर उर्वरीत ३२ यात्रेकरु किरकोळ जखमी आहेत.

अपघातीची माहिती मिळताच केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी उत्तर प्रदेश राज्य सरकारडे संपर्क साधला व अपघातातील जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले. केंद्रिय मंत्र्यांनी एवढयावरच न थांबता तेथील जिल्हाधिकारी दिनेश कुमार, सिएमओ डॉ.सुनिल पांडे यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधुन जखमींना तात्काळ मदत करण्याचे सुचना दिल्या.

केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांचे सहाय्यक खाजगी सचिव डॉ.गोपाल डिके, आचल भाटीया हे घटनास्थळी हे मदतीसाठी गाजीपुर कडे रवाना झाले आहेत. तर दिल्ली येथील मंत्रालयातुनही संबधितांना निर्देशित करुन अपघातग्रस्तांना मदत करण्याचे काम केल्या जात आहे.

# भारतानं अणुऊर्जा कार्यक्रमात गाठला ऐतिहासिक टप्पा

## पीएफबीआरनं 'फर्स्ट क्रिटिकॅलिटी' केली साध्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतानं आपल्या अणुऊर्जा कार्यक्रमात मोठं यश मिळवलं आहे. तामिळनाडूतील कल्पक्कम येथे असलेल्या प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरनं (पीएफबीआर) 'फर्स्ट क्रिटिकॅलिटी' साध्य केली आहे. या टप्प्याचा अर्थ असा आहे की, रिॲक्टरनं स्वयंपूर्ण अणुविखंडन साखळी अभिक्रिया सुरू केली आहे. प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टर वापरत असलेल्या इंधनापेक्षा जास्त इंधन निर्माण करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याला ''भारताच्या नागरी अणुऊर्जा प्रवासातील एक निर्णायक पाऊल'' म्हटलं आहे. या प्रकल्पाशी संबंधित शास्त्रज्ञ, अभियंत्यांचं त्यांनी अभिनंदन केलं आहे. या यशामुळं भारतातील आत्मनिर्भर अणुइंधन आणि थोरियमच्या वापराला चालना मिळेल.

फास्ट ब्रीडर रिॲक्टर म्हणजे काय? : ब्रीडर रिॲक्टर हा अणुभट्टीचा एक विशेष प्रकार आहे, जो वीज निर्मिती करताना, अणुप्रक्रियांसाठी आवश्यक असलेले विखंडनक्षम पदार्थ (फिसाइल मटेरियल) वापरत असलेल्या पदार्थापेक्षा जास्त प्रमाणात निर्माण करतो. पारंपरिक थर्मल रिॲक्टरच्या विपरीत, ही अणुभट्टी वेगवान न्यूट्रॉनचा वापर करते. भारतातील ही पीएफबीआर ५००-मेगावॅट क्षमतेची अणुभट्टी असून तिची रचना आणि बांधकाम पूर्णपणे स्वदेशी आहे. यात युरेनियम-प्लुटोनियम मिश्रित ऑक्साइड इंधनाचा वापर केला जातो आणि शीतलक म्हणून द्रव सोडियमचा उपयोग होतो. ही अणुभट्टी उच्च तापमानातही सुरक्षितपणे कार्यरत राहण्यास सक्षम आहे. या अणुभट्टीचं वैशिष्ट्य म्हणजे तिचं ''बंद इंधन चक्र', कारण त्यातून बाहेर टाकलेल्या वापरलेल्या इंधनावर पुन्हा प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जाऊ शकतो. यामुळं इंधनाची बचत होते आणि कचऱ्यात घट होते. ही अणुभट्टी इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्रानं विकसित केली असून, तिचं बांधकाम भारतीय नाभिकीय विद्युत निगम लिमिटेडनं पूर्ण केलं आहे.

''फर्स्ट क्रिटिकॅलिटी'' म्हणजे काय?: ''फर्स्ट क्रिटिकॅलिटी'' हा अणुभट्टीच्या कार्यान्वयन प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यावर, अणुभट्टीचा गाभा (कोर) स्वयंपूर्ण अवस्था प्राप्त करतो. याचा अर्थ असा की, विखंडन प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या न्यूट्रॉनची संख्या ही ऊर्जा उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या न्यूट्रॉनच्या संख्येइतकी होते. यानंतर, अणुभट्टी सुरक्षितपणे पुढील टप्प्यात जाऊ शकते. कल्पक्कम पीएफबीआरनं ६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८:२५ वाजता ही क्रिटिकॅलिटी प्राप्त केली. सर्व सुरक्षा तपासण्या पूर्ण झाल्यानंतर अणुऊर्जा नियामक मंडळानं यासाठी परवानगी दिली होती. या यशासह, भारत आता आपल्या तीन-टप्प्यांच्या अणुकार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. पहिला टप्पा 'दाबयुक्त जड पाणी अणुभट्ट्यांवर' आधारित आहे, तर दुसऱ्या टप्प्यात 'जलद प्रजनक अणुभट्ट्यांचा' समावेश होतो. तिसरा टप्पा भारताच्या विशाल थोरियम साठ्याचा वापर करेल, ज्यामुळं देशाला दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे शक्य होईल.

भारतातील अणुऊर्जेची सद्यस्थिती आणि भविष्य: सध्या, भारतातील अणुऊर्जा प्रकल्पांची निर्मिती क्षमता ८.७८ गिगावॅट इतकी आहे. गेल्या वर्षी, पूर्णपणे स्वदेशी असलेल्या अणुऊर्जा प्रकल्पांनी ५६,६८१ दशलक्ष युनिट्स विजेचं उत्पादन केलं; हे एकूण वीज उत्पादनाच्या ३.१ टक्के इतकं होतं. सध्या ७०० मेगावॅट आणि १,००० मेगावॅट क्षमतेच्या अणुभट्ट्यांचं बांधकाम सुरू आहे. ही क्षमता २०२३ पर्यंत २२.३८ गिगावॅटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात, सरकारनं २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट निश्चित केलं आहे. ''अणुऊर्जा अभियाना'' अंतर्गत, 'लघु मॉड्यूलर अणुभट्ट्यांसाठी' २०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०२३ पर्यंत किमान पाच एश्ठे कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. हे सर्व प्रयत्न २०७० पर्यंत 'निव्वळ-शून्य उत्सर्जन' साध्य करण्याच्या उद्दिष्टात मोलाचं योगदान देतील.

महत्त्व आणि भविष्यातील परिणाम: इइँठ च्या 'क्रिटिकॅलिटी'चं (अणुभट्टीच्या कार्यारंभाच्या निर्णायक क्षणाचे) महत्त्व केवळ एक तांत्रिक विजय म्हणून नाही, तर ऊर्जा आत्मनिर्भरता, पर्यावरण संरक्षण आणि आर्थिक विकासाच्या दिशेनं टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून आहे. ही कामगिरी भारतीय शास्त्रज्ञांच्या समर्पणाचे प्रतीक म्हणून उभी आहे. येत्या काही महिन्यांत जेव्हा पूर्ण क्षमतेनं वीज निर्मिती सुरू होईल.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार, विजय वडेट्टीवार यांनी केलं स्पष्ट

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर। प्रतिनिधी :** सर्वांचंच लक्ष बारामतीतकडं लागलं आहे. काँग्रेसचा उमेदवार आपला अर्ज मागे घेईल की नाही याबाबत तर्क लढवले जात असताना काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भूमिका स्पष्ट केली. काँग्रेसचा उमेदवार बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून माघार घेणार असल्याचं वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं. काँग्रेसचे उमेदवार अर्ज माघारी घेतील, अशी माहिती वडेट्टीवार यांनी दिली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याबरोबर बुधवारी काँग्रेसच्या सर्व प्रमुख नेत्यांची चर्चा झाली. अनेकांनी या संदर्भातील सकारात्मक भावना प्रदेशाध्यक्षांपर्यंत कळवली आहे. माघार घेतली पाहिजे, अशीच अनेकांची भूमिका आहे. आता प्रदेशाध्यक्ष सर्व नेत्यांची भावना काँग्रेसचे केंद्रीय श्रेष्ठींना कळवतील व त्यांच्या परवानगीनं अर्ज मागे घेण्याचा निर्णय होईल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

प्रथा-परंपरा पाळल्या जाव्यात - ''बारामती निवडणुकीच्या संदर्भात प्रदेशाध्यक्षांना अनेकांचे फोन आले. सुनेत्रा पवार यांनी देखील प्रदेशाध्यक्षांना फोन केला. या निवडणुकीत पुढं जाऊ नये आणि इथेच थांबावं अशीच भूमिका आणि भावना सर्वांचीच आहे. त्यामुळं आमच्या नेत्यांचं एकमत झालं. जर प्रथा, परंपरा कुणीच पाळत नाही. त्यामुळं आम्ही फॉर्म भरला होता,'' असं विजय वडेट्टीवार म्हणाले. अजित दादावर एक नेता म्हणून असलेलं जे प्रेम आहे, नेता म्हणून त्यांना लोकांमध्ये एक स्थान होतं. त्याचा मान आहे, असंही त्यांनी सांगितलं.

सुनिल तटकरे, प्रफुल पटेल भाजपाचे - ''सुनिल तटकरे आणि प्रफुल पटेल यांचं भाजपाशिवाय पान हालत नाही, अशी चर्चा महाराष्ट्रात सर्वदूर होती. त्यामुळंच दोघांना अद्याप महत्त्वाचं पद राष्ट्रीय कार्यकारणीत दिलं गेलं नाही. ते दादांपासून दुरावत चालले होते, हे त्यांचेच नेते बोलतात. कदाचित आजही तशीच भावना असेल. पण, राष्ट्रवादीमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत धुसफूस संदर्भात काँग्रेस म्हणून बोलण्याचा अधिकार नाही. सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड होण्यासाठी त्या दोघांनी कुणालाही फोन केले नाहीत, कदाचित त्यांना माहीत असेल की आपलं कोणी ऐकणार नाही,'' असं म्हणत विजय वडेट्टीवार यांनी तटकरे आणि पटेल यांच्यावर टीका केली.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांचा मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्याकडून आढावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हॅमअंतर्गतची कामे, विभागाच्या कर्मचाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम, नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणारी कामे, महामार्गावरील जनसुविधा केंद्रे यासह विविध विषयांचा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह भोसले यांनी आढावा घेऊन कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

मंत्री भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाची आढावा बैठक मंत्रालयातील दालनात घेतली.





यावेळी विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे, सचिव (रस्ते) राजभोज यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

मंत्री भोसले म्हणाले की, स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक स्त्रोत निर्माण व्हावा, त्यांच्या शेतमालाला ग्राहक मिळावे, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध टोलनाक्याजवळ शेतकऱ्यांना भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून दिल्यास शेतकरी बाजार सारखा उपक्रम राबविता येईल. यातून स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला ग्राहक उपलब्ध होईल व त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत होईल. राज्यातील काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम राबविण्यात यावे, असे मंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा जास्तीत जास्त वापर करावा. विभागाच्या वतीने करण्यात येणारी कामे, रस्त्यांचा दर्जा, देयके, महामार्गावरील खड्डे आदी विविध बाबतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात येणारी कामे ही दर्जेदार व्हावीत, याकडे लक्ष द्यावे. तसेच विभागाच्या क्षेत्रीय स्तरावर नियमित बैठका घेऊन विविध कामांचा आढावा घेण्यात यावा, असेही मंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले.

# खामगाव एमआयडीसीत एलपीजी गॅस गळतीचे 'महा-मॉकड्रिल' यशस्वी

## – जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती सज्जतेची मोठी चाचणी – विविध यंत्रणांचा उत्स्फूर्त सहभाग





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** औद्योगिक क्षेत्रात अचानक उद्भवणाऱ्या भीषण रासायनिक आपत्तींना तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि औद्योगिक वसाहती किती सज्ज आहेत, याची प्रत्यक्ष प्रचिती आज खामगाव येथे आली. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार आणि निवासी जिल्हाधिकारी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली 'वन एशिया नेटवर्क इंडिया प्रा. लि.', एमआयडीसी, खामगाव येथे एलपीजी गॅस टँकर गळती संदर्भात एक भव्य 'मॉकड्रिल' (रंगीत तालीम) यशस्वीरित्या पार पडले.

आज दुपारी ११:३० वाजता कंपनीच्या टँकर लोडिंग परिसरात गॅस गळती झाल्याचा काल्पनिक प्रसंग निर्माण करण्यात आला. गळती लक्षात येताच कंपनी व्यवस्थापनाने तातडीने जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला. या माहितीच्या आधारे जिल्हा प्रशासनाची यंत्रणा अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल होऊन कार्यान्वित झाली. या संपूर्ण मोहिमेचे संचलन व समन्वय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अमर पुरुषोत्तम भोगे यांनी केले.

अग्निशमन दलाचे अग्निशमन अधिकारी नागेश रोठे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने वॉटर कर्टन तयार करून हवेतील गॅस विरळ केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरेंद्र अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात तातडीने नाकेबंदी करण्यात आली. संभाव्य अग्निभय टाळण्यासाठी महावितरणने परिसराचा वीजपुरवठा त्वरित खंडित केला. कंपनीच्या आपत्कालीन आराखड्यानुसार सायरन वाजवून कर्मचाऱ्यांचे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले.

या सरावाचे तांत्रिक निरीक्षण करण्यासाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अमर पुरुषोत्तम भोगे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गजानन प्रल्हाद घिरके, खामगावच्या नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, महावितरणचे सहाय्यक अभियंता सचिन फेरण, तसेच वन एशिया नेटवर्कचे जी.एम. राजेश सिन्हा उपस्थित होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य गुलाबसिंग राजपूत आणि प्रदिप सोनवणे यांनीही मोहिमेत सक्रिय भूमिका बजावली.

मॉकड्रिलचा उद्देश : औद्योगिक क्षेत्रात एलपीजी गॅस गळतीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास, विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वय आणि त्यांचा रिस्पॉन्स टाइम (प्रतिसाद वेळ) तपासणे हा या सरावाचा मुख्य उद्देश होता. प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी गोंधळ उडू नये आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून जीवित व वित्तहानी कशी टाळावी, याचे यशस्वी प्रशिक्षण या निमित्ताने देण्यात आले. या यशस्वी सरावामुळे खामगाव औद्योगिक परिसरातील सुरक्षिततेचा आत्मविश्वास वाढला असून, जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. मोहिमेच्या सांगतेनंतर वन एशिया नेटवर्कच्या वतीने सर्व सहभागी यंत्रणांचे आभार मानण्यात आले.

## मे महिन्यात श्री तुळजाभवानी मंदिराच्या विकास कामांचे भूमिपूजन - पालकमंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी :** कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिराच्या विकास कामांचे भूमिपूजन मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्रालयात या संदर्भात आज आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीस आमदार राणाजगजीतसिंह पाटील,छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य शासनाने सुमारे १८६५ कोटी रुपयांच्या श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे.त्यापैकी ४२१ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विकास कामांमुळे बाधित होणाऱ्या १०५ खाजगी मालमत्तांपैकी सुमारे ७५ टक्के मालमत्ता धारकांशी शासनाने यशस्वी वाटाघाटी केल्या आहेत.त्यामुळे उर्वरित विकास कामांची निविदा प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर,तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यांतर्गत विविध कामांचे भूमिपूजन मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** राज्यात गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी १९ वर्षांखालील खेळाडूंच्या निवडीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. सरळ प्रवेश तसेच खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे.

राज्यातील अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद आणि पुणे येथे क्रीडा प्रबोधिनी केंद्रे कार्यरत असून, नव्या प्रशिक्षणार्थींची निवड प्रस्तावित आहे. या प्रबोधिनींमध्ये आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शूटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक्स, जलतरण, फुटबॉल, ट्रायथलॉन व सायकलिंग अशा एकूण १६ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते.

क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळ राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ज्ञ समितीद्वारे चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. वैद्यकीय चाचणीमध्ये निवड झालेल्या शारीरिक दृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड करण्यात येईल. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षांखालील तसेच महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे अनिवार्य आहे.

क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी खेळाडूकडे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे दि.२४ एप्रिल २०२६ पुर्वी सादर करावे. सदर अर्जात खेळाडूचा संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी नमुद करावा.

विभागस्तरावर चाचण्यांचे आयोजन दि. २७ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विभाग स्तरावर होणार आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील पात्र संबंधीत खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलडाणा येथुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रासह दि.२४ एप्रिल २०२६ पर्यंत सादर करावे. तसेच अधिक माहितीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

## 'अमृत' कडून राज्यव्यापी परिवार सर्वेक्षण मोहिम; ८ ते २५ एप्रिलदरम्यान

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्याकडून राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ८ ते २५ एप्रिल या कालावधीत राज्यव्यापी परिवार सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे सर्वेक्षण राबविण्यात येणार असून, लक्षित गटातील कुटुंबांची अचूक संख्या निश्चित करणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा जाणून घेणे तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या योजना तयार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकांच्या उन्नतीसाठी अमृत संस्था कार्यरत आहे. सध्या या सर्वेक्षणात ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी आणि वैश्य अशा सुमारे २५ जातींचा समावेश आहे. सर्वेक्षणानंतर या यादीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

या घटकांतील युवक-युवतींसाठी व्यक्तिमत्त्व विकास, औद्योगिक व प्रगत कौशल्य प्रशिक्षण, रोजगारक्षम कौशल्य विकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाहाय्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन तसेच उद्योग-व्यवसाय वृद्धीसाठी वैयक्तिक व्याज परतावा अशा विविध योजना सध्या राबविल्या जात आहेत.

भविष्यात या योजनांची व्याप्ती वाढवून अधिक परिणामकारक व मूल्यवर्धित योजना तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी मोठ्या संख्येने या नोंदणी मोहिमेत सहभागी होऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमानी यांनी केले आहे.

# डिजिटल जनगणना २०२७ च्या तयारीला वेग

➤ जिल्हास्तरीय क्षेत्रीय प्रशिक्षण संपन्न

➤ जनगणनेचे कार्य अचूकपणे पूर्ण करा- डॉ. प्रवीणकुमार देवरे







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रशासकीय तयारीने वेग घेतला आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे कागदविरहित आणि डिजिटल पद्धतीने पार पडणार असून, ही माहिती भविष्यातील भारताची अर्थव्यवस्था बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाद्वारे तांत्रिक बाबी सखोल समजून घेऊन जनगणनेचे कार्य अचूकपणे पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिले.

जिल्हा नियोजन सभागृह आणि जिजाऊ सभागृह येथे जिल्हास्तरीय क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण दोन बॅचेसमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा समारोप ८ एप्रिल रोजी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या उपस्थितीत झाला, यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनीही प्रशिक्षणास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. जनगणनेचे काम करताना कोणतीही त्रुटी राहू नये आणि प्रक्रियेत पारदर्शकता राखली जावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. कर्मचाऱ्यांनी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा, डेटा संकलनाची पद्धत नीट समजून घ्यावी आणि फिल्डवर काम करताना येणाऱ्या अडचणींवर तात्काळ उपाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

या मोहिमेअंतर्गत ८१ फिल्ड ट्रेनर्सना चार मास्टर ट्रेनर्समार्फत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष कामाचा अनुभव येण्यासाठी ग्रामीण भागातील येळगाव ता. जि. बुलढाणा व शहरी भागातील बुलढाणा येथील राम नगर या भागात काही घरांना भेटी देऊन प्रत्यक्ष जनगणनेची प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आली. यावेळी जनगणना संचालनालयाचे पवन घोडे व मयूर पवार (सांख्यिकी अन्वेषक ग्रेड ), मास्टर ट्रेनर संजय खडसे उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा आणि डॉ. रामेश्वर पुरी उपविभागीय अधिकारी, खामगाव यांच्यासह सर्व क्षेत्रीय प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी सुरेश कव्हळे, तहसीलदार संजीवणी मुपडे, आणि नायब तहसीलदार प्रमोद करे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वांनी समन्वयाने आणि जबाबदारीने हे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## वृत्तविशेष...

### प्रेमाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीचे अपहरण; मुंबईत अत्याचार, सिटी कोतवलीत गुन्हा दाखल



**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती । प्रतिनिधी :** अमरावती शहरात एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. १७ वर्षांच्या अल्पवयीन पीडितेला प्रेमाचे आमिष दाखवून अपहरण करण्यात आले. तिला मुंबईत नेऊन दोन दिवस जबरदस्ती ने अत्याचार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, आरोपी हा पीडितेचा नातेवाईक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी ने पीडितेला फूस लावून मुंबईला नेले. तेथे तिला जबरदस्तीने मद्य पाजून दोन दिवस अत्याचार करण्यात आले. त्यानंतर वाद झाल्याने आरोपीने तिला मारहाण करून अमरावती रेल्वे स्थानकावर सोडून फरार झाला. ७ एप्रिल रोजी पीडिता जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेण्यासाठी दाखल झाली असता सिटी कोतवाली पोलिसांना सर्व हकीकत स्पष्ट करण्यात आली आरोपीला अटक करण्यासाठी विशेष पथक तयार केले असून त्याचा शोध सुरू आहे. अशी माहिती पोलीस उपायुक्त शाम घुगे यांनी दिली

### सलमान खान स्टारर 'मातृभूमी' हा एक सामान्य वॉरवर आधारित चित्रपट नसेल

**दैनिक आपला विदर्भ**

हैदराबाद: अभिनेता सलमान खान अभिनीत 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' हा चित्रपट काही दिवसात रिलीज होईल.'मातृभूमी' संकल्पना ही नेहमीच थरारक युद्ध दृश्यांऐवजी एका भावनिक कथेवर केंद्रित राहिली आहे. आता असं म्हटलं जात की, अगदी पहिल्यापासूनच सलमाननं हे स्पष्ट होतं की 'मातृभूमी' हा कधीही एक पारंपरिक वॉर चित्रपट असणार नाही.

'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस'मध्ये दाखविण्यात येईल सैनिकाची मानवी बाजू : चित्रपटात एका सैनिकाची मानवी बाजू दाखविण्यात येईल. एक रणांगणावर आणि दुसरे घरी, असे दोन आयुष्य जगण्याचा भावनिक संघर्ष दाखविणं आवयश्क ठरेल असंही अभिनेत्यानं सांगितलं. ही संवेदनशीलता आणि विचारांमधील स्पष्टता याला खऱ्या अर्थानं इतरांपेक्षा वेगळे ठरवते. हा दृष्टिकोन नेहमीच्या युद्धकथांपेक्षा खूप वेगळा आहे, ज्यांमध्ये सैनिकांच्या अंतर्गत संघर्षावर आणि भावनिक गोंधळावर भर दिला जातो. प्रेम, त्याग आणि ओळख यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करून, हा चित्रपट केवळ ॲक्शन आणि देशभक्तीच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करण्याचा प्रयत्न करणार आहे.

'मातृभूमी' चित्रपटाबद्दल : 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटाची निर्मिती सलमान खान फिल्म्सच्या बॅनरखाली सलमा खान यांनी केली असून, दिग्दर्शन अपूर्व लाखिया यांनी केलंय. हा चित्रपट शौर्य, त्याग आणि लढाऊ वृत्तीचे एक धाडसी चित्रण असेल असे आश्र्वासन देतो. या चित्रपटामध्ये चित्रांगदा सिंग देखील एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट यापूर्वी १७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र आता प्रदर्शनाची तारीख पुढं ढकलण्यात आली आहे.

'सिकंदर' चित्रपट शेवटचा चित्रपट : सलमान खानचे चाहते चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची आतुरतेनं वाट पाहत आहेत. सध्या निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत कुठलही माहिती दिली नाही. दरम्यान, सलमान देखील त्याच्या चित्रपटाच्या प्रदर्शनाची वाट पाहत आहे. कामाच्या आघाडीवर, तो शेवटचा 'सिकंदर' चित्रपटात दिसला होता. त्याचा हा चित्रपट फ्लॉप ठरला. या चित्रपटामध्ये त्यांच्याबरोबर मुख्य भूमिकेत रश्मिका मंदान्ना ही साऊथ अभिनेत्री होती.

### मांजरी स्टेशनचा कायापालट

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** पुणे रेल्वे विभागाने वाढती प्रवासी गर्दी आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण लक्षात घेऊन दोन महत्त्वाचे प्रकल्प जाहीर केले आहेत. मांजरी स्थानकाचे उन्नतीकरण आणि रामटेकडी येथे नवीन ब्लॉक स्टेशन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे गाड्यांच्या विलंबाचा प्रश्न कमी होण्याची अपेक्षा आहे.सध्या मांजरी हे केवळ एक हाल्ट स्थानक असून येथे मर्यादित गाड्या थांबतात. मात्र आता त्याचा 'इ' श्रेणीतील स्थानकात समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी अधिक सुविधा आणि सेवा उपलब्ध होणार आहेत.